**वाचले**

१) पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक-ध्वनीप्र-२१००९/प्र.क्र.१२/०८/तां.क.१ दि.२२/०८/२०१७
२) अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचेकडील पत्र क्र/जिविशा/टे-१३/गणेशोत्सव/२०१८-३८०९ दि.१४/०९/२०१८
३) या कार्यालयाचे आदेश क्र/गृह/का.१/टे.३/ध्वनी प्रदुषण सुट/कावि-१४४८/१८ दि.१४/०९/२०१८
४) श्री.इस्तीयाक बै.खान, मदरसा अहेल सुन्नत गौसूल वारा, रा.आदर्श नगर, पो.सातिवली, वसई (पुर्व),ता.वसई, जि.पालघर यांनी त्यांचेकडील पत्र दि.१८/०३/२०१८
५) पोलीस अधीक्षक पालघर यांचेकडील पत्र क्र/जिविशा/टे-१३/मोहरम/२०१८-३८५५ दि.१८/०९/२०१८
६) या कार्यालयाचे सुधारित आदेश आदेश क्र/गृह/का.१/टे.३/ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक सुट/कावि-१४७०/१८ दि.१९/०९/२०१८
७) पोलीस अधीक्षक पालघर यांचेकडील पत्र क्र/जिविशा/टे.१३/नवरात्र/२०१८-४१५९ दि.१६/१०/२०१८

---

जिल्हा दंडाधिकारी पालघर जिल्हा पालघर

क्र/गृह/का.१/टे.३/ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक सुट/कावि- १६०८/१८ दि.१६/१०/२०१८

**शुध्दीपत्रक :-**

ज्याअर्थी पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी उपोद्घातातील शासन निर्णय अ.क्र.१ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारीत नियम २०१७ च्या नियम ५ उपनियम (३) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरण टिपणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादिंच्या वापराबाबत श्रोतगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयाच्या निकडीनुसार वर्षामध्ये १५ दिवस निश्चित करुन सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सुट जाहिर करण्याकरीता संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना राज्य शासनाव्दारे प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी अपर पोलीस अधीक्षक पालघर यांचे उपोदद्घातातील अ.क्र.२ अन्वये प्राप्त अभिप्राय विचारात घेता या कार्यालयाचे उपोद्घातातील अ.क्र.३ अन्वये पारीत करण्यात आलेल्या आदेशान्वये सन २०१८ या वर्षातील ८ सण/उत्सवांकरीता एकुण १३ दिवस ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सुट देण्यात आली असून उर्वरीत २ दिवस पोलीस विभागाशी सल्लामसलत करुन आवश्यकतेनुसार त्यावेळी जाहिर केले जातील,असे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये श्री.इस्तीयाक बै.खान, रा.वसई यांनी मोहरम सणानिमित्त कर्बला शाहिद या प्रसंगाचे व्याख्यान दि.२०/०९/२०१८ रोजी सकाळी १० ते रात्री १२ पर्यंत भरवण्यात येत असल्याने ध्वनीची विहीत मर्यादा राखून ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासून रात्री १२.०० वाजेपर्यंत सुट देणेकामी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक पालघर यांनी उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये केलेल्या शिफारसीनुसार या कार्यालयाचे उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये सुधारित आदेश पारीत करुन राखीव २ दिवसांपैकी एक दिवस मोहरम सणाकरीता सुट देण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.७ अन्वये पोलीस अधीक्षक पालघर यांनी या कार्यालयाचे आदेश दि.१४/०९/२०१८ अन्वये उत्सवाचे वेळी ज्या १३ दिवसांकरीता ध्वनीची विहित मर्यादा राखुन ध्वनीवर्धक व ध्वनीपेक्षक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासुन रात्री १२.०० वाजेपर्यत सुट देण्यात आलेली आहे, त्यापैकी नवरात्रीच्या वेळी सुट देण्यात आलेल्या दोन दिवसांपैकी दि.१७/१०/२०१८ रोजी अष्टमी येत असून दि.१८/१०/२०१८ रोजी नवमीला दसरा येत आहे. सबब त्यात बदल करुन सदरचे ०२ दिवस व्यतिरिक्त सप्तमी दि. १६/१०/२०१८ व अष्टमी दि.१७/१०/२०१८ रोजी असे ०२ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखुन ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासुन रात्री १२.०० वाजेपर्यत सुट देण्यास हरकत नाही, असा अहवाल सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.६ अन्वये पोलीस अधीक्षक पालघर यांनी सन २०१८ या वर्षाकरीता ध्वनीवर्धक व ध्वनीपेक्षक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासुन रात्री १२.०० वाजेपर्यत सुट देण्यात आलेल्या दिवसांपैकी नवरात्रीच्या दोन दिवसांमध्ये दि.१७/१०/२०१८ रोजी अष्टमी येत असून दि.१८/१०/२०१८ रोजी दसरा येत

असल्याने त्यामध्ये बदल करुन त्याऐवजी सप्तमी दि.१६/१०/२०१८ व अष्टमी दि.१७/१०/२०१८ रोजी असे ०२ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखुन ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासुन रात्री १२.०० वाजेपर्यत सुट देणेकामी करण्यात आलेली शिफारस मान्य करण्यात येत आहे.

त्याअर्थी मी **डॉ.प्रशांत नारनवरे, जिल्हादंडाधिकारी पालघर** मला उपोद्घातातील अ.क्र. १ अन्वये पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिलेल्या निर्देशान्वये या कार्यालयाचे उपोद्घातातील आदेश क्र.३ अन्वये सन २०१८ या वर्षातील ८ सण/उत्सवांकरीता १३ दिवस ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत देण्यात आलेल्या सुटीच्या दिवसांपैकी नवरात्रीच्या वेळी सुट देण्यात आलेल्या दोन दिवसांपैकी दि.१७/१०/२०१८ रोजी अष्टमी व दि.१८/१०/२०१८ रोजी नवमीला दसरा येत असल्याने सदर दिवशी देण्यात आलेली सुट रद्द करुन सदरचे ०२ दिवसांचे ऐवजी **सप्तमी दि.१६/१०/२०१८ व अष्टमी दि.१७/१०/२०१८** रोजी असे ०२ दिवस ध्वनीची विहित मर्यादा राखुन ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याकरीता सकाळी ०६.०० वाजल्यापासुन रात्री १२.०० वाजेपर्यत सुट घोषित करीत आहे.

**सही/-**
**(डॉ.प्रशांत नारनवरे)**
**जिल्हादंडाधिकारी पालघर**

**प्रत:-**

१) मा.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,मंत्रालय, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी सादर.

२) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सादर.

३) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, विरार यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

५) पोलीस अधीक्षक पालघर

२/- सदर आदेशाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी.

६) जिल्हा सुचना विज्ञान अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर

२/- सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या संकलनास सादर करण्यात यावा.

७) जिल्हा माहिती अधिकारी पालघर

२/- सदर आदेशास आपल्या स्तरावरुन व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी व वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या कात्रणाच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात.

(स्थळप्रतीवर मा.जि.दं. यांची सही असे)

जिल्हादंडाधिकारी पालघर करीता